THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 10TH APRIL 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

इंडियाचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख १४ फेब्रुवारी सन १८९० रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९० चा आक्ट नंबर २.

**सन १८६४ चा आक्ट १७, सन १८६५ चा आक्ट १०, सन १८७४ चा आक्ट २ आणि सन १८८१ चा आक्ट ५, हे सुधारण्याबाबद आक्ट.**

ज्या अर्थीं सन १८६४ चा आक्ट १७ (सरकारी ट्रस्टीचा हुद्दा निर्मित करण्याबाबद आक्ट), सन १८६५ चा हिंदुस्तानांत मालाच्या वारसाविषयीं आक्ट, सन १८७४ चा आड्मिनिस्ट्रेटर जनरलबाबद आक्ट आणि सन १८८१ चा प्रोबेटबाबतचा व वहिवाट करण्याबाबतचा आक्ट हे आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या-अर्थीं खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

### सन १८६४ चा आक्ट १७.

सन १८६४ चा आक्ट १७, कलम १, यांत जास्त मजकूर दाखल करणें.

१. सन १८६४ चा आक्ट १७, कलम १, यांत, "है कोर्ट" या संज्ञेच्या व्याख्येच्या अगोदर, खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"सरकार."

"सरकार" या शब्दाचा अर्थ, बंगाल इलाक्याच्या संबंधानें गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल असा समजावा; मद्रास इलाक्याच्या संबंधानें मद्रासचे गव्हर्नर इन् कौन्सिल असा समजावा; आणि मुंबई इलाक्याच्या संबंधानें मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल असा समजावा :"

सन १८६४ चा आक्ट १७, कलम १, याच्या नंतर नवीन कलम दाखल करणें.

२. सदर्हू आक्टाच्या १ ल्या कलमानंतर, खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

इलाक्यांवर दिलेल्या हवाल्यांचा अर्थ करणें.

"२. या आक्टांत, बंगाल इलाक्यावर, मद्रास इलाक्यावर आणि मुंबई इलाक्यावर दिलेले हवाले, ज्या ज्या मनुष्यांसाठीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांना कायदे व कानू करण्याचा विवक्षित काळीं अधिकार आहे त्या सर्व मनुष्यांच्या संबंधानें म्हटले म्हणजे, बंगाल इलाका, मद्रास इलाका व मुंबई इलाका या संज्ञांच्या, आड्मिनिस्ट्रेटर जनरलाचा हुद्दा व कामें यांबाबदच्या विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कायद्यांत जसजशा निरनिराळ्या व्याख्या केल्या आहेत तसतशा त्या त्या इलाक्यावर दिले आहेत असें समजून वाचावे."

५ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

३. सदर्हू आक्टाच्या ५ व्या कलमाबद्दल खालीं दिलेलें कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:—

सरकारी ट्रस्टींची नेमणूक, त्यांस सस्पेंड करणें व बर्तर्फ करणें.

"५. या आक्टाअन्वयें नेमावयाचा प्रत्येक सरकारी ट्रस्टी सरकारानें नेमिला पाहिजे, आणि त्याला त्याच्या कामावरून सस्पेंड करण्याचा किंवा बर्तर्फ करण्याचा त्या सरकारास अख्त्यार आहे."

सन १८६४ चा आक्ट १७, कलम ६, याची सुधारणूक.

४. सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमांत "ज्या चीफ जस्टिसानें त्यास नेमिलें असेल तो चीफ जस्टिस" या शब्दांच्या ऐवजीं "सरकार" हा शब्द दाखल करावा.

सन १८६४ चा आक्ट १७, कलम ७, याची सुधारणूक.

५. सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमांतील "जेव्हां कोणताहि सरकारी ट्रस्टी गैरहजिरीची रजा घेईल, तेव्हां कोणातरी मनुष्यास सरकारी ट्रस्टीच्या हुद्यानें काम करण्यासाठीं नेमण्याचा चीफ जस्टिस यास कायद्यावरून अधिकार आहे असें समजावें;" येथपर्यंतच्या मजकुराबद्दल खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"वेळोवेळीं सरकारी ट्रस्टीस गैरहजिरीची रजा देण्याचा सरकारास कायदेशीर अधिकार आहे; मात्र तशी रजा देणें तें, हैकोर्टाच्या अमलदारांस गैरहजिरीची रजा देण्याच्या बाबतींत विवक्षित काळीं ज्या कानू अमलांत असतील त्या कानूंस व त्यांसारख्या दुसऱ्या कानूंस नेहमीं पात्र राहील. जेव्हां कोणताहि सरकारी ट्रस्टी गैरहजिरीची रजा घेईल तेव्हां कोणातरी मनुष्यास सरकारी ट्रस्टीच्या हुद्यानें काम करण्यासाठीं नेमण्याचा सरकारास कायदेशीर अधिकार आहे;"

सन १८६४ चा आक्ट १७ याच्या ११ व्या कलमांत जास्त मजकूर वाढविणें.

६. सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमांत, खालीं लिहिलेला मजकूर जास्त वाढवावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"मात्र असें ठरविलें आहे कां हैकोर्ट सरकारी ट्रस्टीस अशा मिळकतीचा ट्रस्टी नेमण्याबद्दलच्या आपल्या हुकूमावरून विशेष कारणांसाठीं, त्या सरकारी ट्रस्टीस, मुद्दल पैका, वर सांगितलेल्या रकमा व भाडीं यांच्या किंवा यांतून जें कांहीं असेल त्याच्या संबंधानें वेतन ह्मणून, सदर्हू हुकुमांत निर्दिष्ट करावयाच्या व या कलमांत वर ठरविलेल्या दरांहून किंवा दराहून ज्यास्त असणाऱ्या दरांनीं किंवा दरानें कमिशन मिळण्याचा हक्क आहे असें फर्मावण्यास मुखत्यार आहे; सदर्हू विशेष कारणें हैकोर्टानें लिहून ठेविलीं पाहिजेत."

सन १८६४ चा आक्ट १७ यांत नवीन कलमें वाढविणें.

७. सदर्हू आक्टांत, ३२ व्या कलमानंतर, खालीं सांगितलेला मजकूर वाढवावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

मागितलेलीं पत्रकें देणें.

"३३. पत्रकें व हकीकती यांसाठीं सरकार मागण्या करील त्याप्रमाणें, व सरकारास योग्य वाटेल त्या नमुन्याप्रमाणें व त्या रीतीनें तीं सरकारी ट्रस्टीनें दिलीं पाहिजेत."

"३४. [हें कलम केवळ बंगाल इलाक्यांत लागू असल्यामुळें याचा तर्जुमा केला नाहीं].

८. ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या वेळीं सरकारी ट्रस्टीच्या जागेवर असलेला प्रत्येक मनुष्य, ह्या आक्टावरून सुधारलेला सन १८६४ चा आक्ट १७ वा याअन्वयें नेमलेला आहे असें समजावें.

ह्या आक्टाच्या सुरुवातीच्या वेळीं कामावर असलेले सरकारी ट्रस्टी.

## सन १८६५ चा हिंदुस्तानांत मालाच्या वारसाविषयींचा आक्ट.

९. सन १८६५ चा हिंदुस्तानांत मालाच्या वारसाविषयींचा आक्ट, याच्या ३२६ व्या कलमापुढें खालीं दिलेलें कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:—

सन १८६५ चा आक्ट १० वा, कलम ३२६, यानंतर नवीन कलम दाखल करणें.

"३२६ अ. ब्रिटिश इंडियांत स्थायिक वस्ती नसलेला मनुष्य, ब्रिटिश इंडियांत आणे मरणसमयीं ज्या देशांत त्याची स्थायिक वस्ती होती त्या देशांतहि ऐवज ठेवून मरण पावेल तेव्हां, आणि ब्रिटिश इंडियांतल्या ऐवजाच्या संबंधानें ब्रिटिश इंडियांत प्रोबेट अगर वहिवाट करण्याची सनद दिलेली असेल आणि त्याच्या स्थायिक वस्तीच्या देशांतल्या ऐवजाच्या संबंधानें त्या देशांत वहिवाट करण्याची सनद दिलेली असेल तेव्हां, ब्रिटिश इंडियांतील, प्रसंगाप्रमाणें, मृत्युपत्र चालविणारा अगर वहिवाट करणारा यानें कलम ३२० बरहुकुम नोटिसी देऊन त्या नोटिशींत सांगितलेली मुदत संपल्यावर आपणास माहित असलेले कायदेशीर दावे पुरे केल्यानंतर, त्यास, मयताची उरलेली मालमत्ता ह्मणजे शेषधन मिळण्याचा ब्रिटिश इंडियाबाहेर राहणाऱ्या ज्या इसमांचा हक्क असेल त्यांस ती स्वतः वांटून देण्याच्या ऐवजीं, ती त्या इसमांस वांटून देण्याकरितां स्थायिक वस्तीच्या देशांतला, प्रसंगाप्रमाणें, मृत्युपत्र चालविणारा अगर वहिवाट करणारा याच्या संमतीनें त्याकडे पाठविण्याचा अखत्यार आहे."

ब्रिटिश इंडियांतील ऐवज वांटून देण्याकरितां तो स्थायिक वस्तीच्या देशांतल्या मृत्युपत्र चालविणाराकडे अगर वहिवाट करणाराकडे देणें.

## सन १८७४ चा आड्मिनिस्ट्रेटर जनरलबाबद आक्ट.

१०. सन १८७४ चा आड्मिनिस्ट्रेटर जनरलबाबद आक्ट याच्या ३ ऱ्या कलमांतील "बंगाल इलाका" या संज्ञेच्या व्याख्येंतल्या (ब) रकमेंत "ब्रिटिश ब्रह्मदेश" या शब्दांच्या बदला "ब्रह्मदेश" हा शब्द दाखल करावा, आणि त्या आक्टाच्या त्याच कलमांतील "मुंबई इलाका" या संज्ञेच्या व्याख्येंतल्या (अ) रकमेंत "मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या अमलाखालील" या शब्दांनंतर "व ब्रिटिश बलुचिस्तानचा चीफ कमिशनर याच्या कारभाराखालील" हे शब्द ज्यास्त घालावे.

सन १८७४ चा आक्ट २ रा, कलम ३, यांतील "बंगाल इलाका" व "मुंबई इलाका" या संज्ञांच्या व्याख्यांची सुधारणूक.

११. (१) सन १८८१ चा आड्मिनिस्ट्रेटर जनरलबाबद आक्ट याच्या ९ व्या कलमाबरहुकुम सुधारलेलें सदरील सन १८७४ च्या २ ऱ्या आक्टाचें कलम ३७ याच्या पहिल्या पारिग्राफाऐवजीं खालीं दिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

सन १८७४ चा आक्ट २ रा, कलम ३७, याच्या पहिल्या पारिग्राफाऐवजीं नवीन पारिग्राफ दाखल करणें.

"कलम ३६ याखालीं येणाऱ्या बाबतींत, मयत मनुष्याच्या मालमिळकतीच्या अंशावर धनकोच्या नात्याहून इतर नात्यानें हक्क सांगणारा कोणताहि मनुष्य, तीन महिन्यांच्या आंत आड्मिनिस्ट्रेटर जनरलकडून त्याच कलमाबरहुकुम सर्टिफिकेट मिळविणार नाहीं अगर त्या मयत मनुष्याच्या एस्टेटीच्या व मालमिळकतीच्या संबंधानें वहिवाट चालविण्याची सनद मिळणार नाहीं, तर, आणि अशा मयत मनुष्य हिंदु, मुसलमान, पारसी अगर बौद्ध नसेल किंवा त्याला सन १८६५ चा हिंदुस्तानांत मालाच्या वारसाविषयींचा आक्ट, कलम ३३२ याअन्वयें तो आक्ट लागू नसला तर, आड्मिनिस्ट्रेटर जनरल यास, वहिवाट करण्याच्या सनदेशिवाय, ती सनद त्यास दिल्याप्रमाणेंच त्या एस्टेटीची व मालमिळकतीची वहिवाट करण्याचा अखत्यार आहे;".

(२) सदरील आक्टाच्या सदरील कलमाच्या संबंधानें सन १८८१ चा आड्मिनिस्ट्रेटर जनरलबाबद आक्ट याच्या ९ व्या कलमांत जो मजकूर आहे, तो या कलमावरून रद्द केला आहे.

सन १८७४ चा आक्ट २ रा, कलम ४१, यानंतर नवीन कलम दाखल करणें.

१२. सदर्हू आक्टाच्या ४१ व्या कलमानंतर खालीं दिलेलें कलम दाखल करावें तें कलम येणेंप्रमाणें:--

ब्रिटिश इंडियांतील जिंदगी वांटून देण्याकरितां ती स्थायिक वस्तीच्या देशांतल्या मृत्युपत्र चालविणाराकडे अगर वहिवाट करणाराकडे देणें.

"४१ अ. ब्रिटिश इंडियांत स्थानिक वस्ती नसलेला कोणताहि मनुष्य, ब्रिटिश इंडियांत आणि मरणसमयीं ज्या देशांत त्याची स्थायिक वस्ती होती त्या देशांतहि जिंदगी ठेवून मरण पावल्यानंतर, त्याच्या ब्रिटिश इंडियांतील जिंदगीच्या वहिवाटीच्या संबंधानें कलम ३६ अगर कलम ३७ याअन्वयें काम चालविलें असून, स्थायिक वस्तीच्या देशांतल्या जिंदगीच्या संबंधानें त्या देशांत वहिवाट करण्याची सनद मिळाली असेल तेव्हां, प्रसंगाप्रमाणें, कलम ३६ अगर कलम ३७ याअन्वयें दिलेलें सर्टिफिकेट धारण करणारा अगर आड्मिनिस्टेटर जनरल, यानें, मयत मनुष्याच्या एस्टेटीवर धनकोंचे व इतरांचे जे हक्क असतील ते आपणास कळविण्याबाबद त्या धनकोंस व इतरांस, हें कोर्ट वेळोवेळीं साधारण कानू करून ज्या नोटिशी ठरवील, त्या नोटिशी दिल्यानंतर, आणि त्या नोटिशींत सांगितलेली मुदत संपल्यावर आपणास माहित असलेलीं कायदेशीर कर्जें फेडल्यानंतर, त्यास, मयताची बाकीची मालमिळकत ह्मणजे शेषधन मिळण्याचा ब्रिटिश इंडियाबाहेर राहणाऱ्या ज्या इसमांचा हक्क असेल त्यांस ती स्वतः वांटून देण्याच्या ऐवजीं, ती त्यांस वांटून देण्यासाठीं त्या स्थायिक वस्तीच्या देशांतला, प्रसंगाप्रमाणें, मृत्युपत्र चालविणारा अगर वहिवाट करणारा याच्या संमतीनें त्याकडे पाठवून देण्याचा अखत्यार आहे."

सन १८७४ चा आक्ट २ रा, कलम ६४, यांत मजकूर वाढविणें.

१३. सदर्हू आक्टाच्या ६४ व्या कलमांत, खालीं सांगितलेला मजकूर वाढवावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"डिस्ट्रिक्ट जज्ज किंवा असा अमलदार याच्या स्वाधीन असणाऱ्या कोणत्याहि मालमत्तेंतून किंवा अशा मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याहि भागाच्या उत्पन्नांतून खालीं सांगितलेल्या सर्व किंवा कोणत्याहि कारणांसाठीं आपणास जरूर वाटतील त्या रकमा देवविण्यास डिस्ट्रिक्ट जज्ज मुखत्यार आहे; सदर्हू कारणें येणेंप्रमाणें:—

(अ) मयताच्या प्रेतसंस्काराचा, व त्याच्या मृत्युलेखाचें प्रोबेट किंवा त्याची मिळकत व जिंदगी यांच्या संबंधानें वहिवाट करण्याची सनद मिळविण्याचा, खर्च देणें,

(ब) मयत मनुष्य वारला त्या पूर्वील तीन महिन्यांचे आंत कोणत्याहि मजुरानें, कारागिरानें किंवा घरच्या नोकरानें मयताची नोकरी केली असेल त्याबदल देणें झालेलें वेतन देणें, आणि

(क) मयताच्या कुटुंबास ज्या गोष्टींची तत्कालिक गरज असेल त्या गोष्टींच्या संबंधानें मदत करणें,

आणि सन १८६९ चा हिंदुस्तानांत मालाच्या वारसाविषयींचा आक्ट याच्या २७९ व्या कलमांतील, २८० व्या कलमांतील किंवा २८१ व्या कलमांतील, अगर मयत मनुष्यांच्या धनकोंना आपलें कर्ज पूर्वी घेण्याचा हक्क याबाबद विवक्षित काळीं अमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांतील, कोणत्याहि ठरावावरून, सदर्हूप्रमाणें कोणतीहि रक्कम दिली असेल तिच्या कायदेशीरपणास व्यत्यय येतो असें समजूं नये.

१४. सदर्हू आक्टाच्या ६ व्या भागांत ह्मणजे ६६ व्या कलमानंतर खालीं सांगितलेला मजकूर वाढवावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

सन १८७४ चा आक्ट २ रा, भाग ६, यांत मजकूर वाढविणें.

"६७. पत्रकें व हकीकती यांसाठीं सरकार मागण्या करील त्याप्रमाणें, व सरकारास योग्य वाटेल त्या नमुन्याप्रमाणें व त्या रीतीनें, तीं आड्मिनिस्ट्रेटर जनरलानें दिलीं पाहिजेत."

मागितलेलीं पत्रकें देणें.

१५. सदरील आक्टांत, त्याच्या ६ व्या भागानंतर ह्मणजे ६७ व्या कलमानंतर खालीं दिलेला मजकूर दाखल करावा; तो मजकूर येणेंप्रमाणें:—

सन १८७४ चा आक्ट २ रा यांत, बंगाल इलाक्याचे प्रांत करण्याबाबद एक भाग जास्त दाखल करणें.

## "भाग ७.

### बंगाल इलाक्याचा प्रांतिक विभाग.

[तर्जुमा केला नाहीं.]"

### सन १८८१ चा प्रोबेटबाबदचा व वहिवाट चालविण्याबाबदचा आक्ट.

१६. सन १८८१ चा प्रोबेटबाबदचा व वहिवाट चालविण्याबाबदचा आक्ट याच्या १४५ व्या कलमानंतर खालीं लिहिलेलें कलम दाखल करावें; तें कलम येणेंप्रमाणें:—

सन १८८१ चा आक्ट ५ वा, कलम १४५, यापुढें नवीन कलम दाखल करणें.

"१४५ अ. ब्रिटिश इंडियांत स्थायिक वस्ती नसलेला कोणताहि मनुष्य, ब्रिटिश इंडियांत आणि मरणसमयीं ज्या देशांत त्या मनुष्याची वस्ती होती त्या देशांतहि ऐवज ठेवून मरण पावेल तेव्हां आणि ब्रिटिश इंडियांतल्या ऐवजाच्या संबंधानें ब्रिटिश इंडियांत प्रोबेट अगर वहिवाट चालविण्याची सनद दिलेली असेल आणि त्याच्या स्थायिक वस्तीच्या देशांतल्या ऐवजाच्या संबंधानें त्या देशांत वहिवाट करण्याची सनद दिलेली असेल तेव्हां, ब्रिटिश इंडियांतील, प्रसंगाप्रमाणें, मृत्युपत्र चालविणारा अगर वहिवाट करणारा यानें कलम १३९ बरहुकुम नोटिसी देऊन त्या नोटिशींत सांगितलेली मुदत संपल्यावर आपणास माहित असलेलीं कायदेशीर कर्जे फेडल्यानंतर, त्यास, मयताची उरलेली मालमिळकत ह्मणजे शेषधन मिळण्याचा ब्रिटिश इंडियाबाहेर राहणाऱ्या ज्या इसमांचा हक्क असेल त्यांस ती स्वतः वांटून देण्याच्या ऐवजीं, ती त्यांस वांटून देण्यासाठीं त्या स्थायिक वस्तीच्या देशांतला, प्रसंगाप्रमाणें, मृत्युपत्र चालविणारा अगर वहिवाट करणारा याच्या संमतीनें त्याकडे पाठवून देण्याचा अखत्यार आहे."

ब्रिटिश इंडियांतील ऐवज वांटून देण्याकरितां तो स्थायिक वस्तीच्या देशांतल्या मृत्युपत्र चालविणाराकडे अगर वहिवाट करणाराकडे देणें.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.



BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.